Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

Original Article

# शंकर बडे व्यक्तीमत्व आणि कविता विषेश

**मनिषा शालिग्रामजी चरडे**
संशोधक, विद्या विकास कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय समुद्रपूर
**Email:** manishasdhadwe0@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180202
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(A)
Pp. 4-9
February - 2026
**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश***

*शंकर बडे हे वऱ्हाडी बोलीतील महत्त्वाचे ग्रामीण कवी असून त्यांचा बोरी अरब (विदर्भ) येथे झाला. ग्रामीण जीवनाशी घट्ट नाळ जोडलेली असल्यामुळे त्यांच्या कवितेत खेड्यातील माणसं, शेती, निसर्ग, स्त्रीभावना आणि सामाजिक वास्तव यांचे जिवंत चित्रण आढळते. त्यांनी वऱ्हाडी बोलीचा प्रभावी वापर करून मराठी साहित्यात वेगळी ओळख निर्माण केली.त्यांचे इरवा, सगुण, मुगुट हे कवितासंग्रह विशेष गाजले. त्यांच्या लेखनात ग्रामीण संस्कृतीचे दर्शन, शेतकऱ्यांची दारुण अवस्था, आत्महत्येचे सामाजिक संदर्भ, दुष्काळ आणि निसर्गातील बदल यांचे संवेदनशील चित्रण दिसते. स्त्रीजीवनातील मायलेकीचे नाते, सासर-माहेरातील भावविश्व आणि कष्टमय आयुष्य यांचे सूक्ष्म रेखाटन त्यांनी केले आहे.त्यांच्या कवितेत विनोदी शैलीही ठळकपणे दिसते. ग्रामीण भाषेतील चपखल शब्दप्रयोग, संवादात्मक शैली आणि बोलीतील जिव्हाळा यामुळे त्यांच्या कविता वाचकांना आपलेसे वाटतात. शंकर बडे यांनी ग्रामीण साहित्य समृद्ध करून मराठी कवितेला वास्तववादी आणि लोकाभिमुख दिशा दिली आहे.*

***मुख्य शब्द :*** *शंकर बडे, वऱ्हाडी बोली, ग्रामीण साहित्य, शेतकरी जीवन, स्त्रीभावना, निसर्गचित्रण, विनोदी कविता, विदर्भ, सामाजिक वास्तव, मराठी कविता*

## प्रस्तावना

शंकर बडे यांचा जन्म ३ मार्च १९४७ ला बोरी अरब या गावी झाला. ग्रामीण भागाशी नाळ जुळली अशी की, शहराशी संपर्क आला तरी ग्रामीण जीवनाची आठवण विसरले नाही त्यांच्या कविता ही तशाच शब्दाशब्दातून ग्रामजीवन झळकत असते. त्यात वऱ्हाडी भाषा म्हटली की तिच्यात वेगळाच गोडवा आहे. शंकर बडे यांनी आपल्या कविता ही वऱ्हाडी भाषेतच लिहीणे पसंत केले. ' पावसान इचीबहीण कहरच केला...' या बोलीतील बोलणीच्या कवितेनेच वऱ्हाडी साहित्यात लोकप्रियतेचा कळस गाठला. त्यांचे बोरी अरब हे गाव दारव्हा तालुक्यात असून दारव्हा हे यवतमाळ जिल्हयात आहे. बाबा बडे म्हणून परिचीत असणारे शंकर बडे हे आठवीपर्यत गावातच शिक्षण घेत होते. नंतर मात्र बाकी शिक्षण यवतमाळ येथे वाणिज्य महाविद्यालयात प्रवेश घेऊन पूर्ण केले.

## बाणेदार व्यक्तीमत्व

'' व्यक्तीमत्व ही संकलपना मुख्यत्वे माणसशास्त्रीय असल्याचे निदर्शनास येते. विशिष्ट व्यक्तीच्या शारीरिक बौध्दीक मानसिक इत्यादी पैलुचा विचार व्यक्तीमत्वात अभिप्रेय असतो।। १
''कवीचे व्यक्तीमत्व' हा कवितेच्या मुलमापनाच्या अनेक पैलूपैकी एक महत्वाचा पैलू आहे.'' २

वऱ्हाडी मातीतला अस्सल वऱ्हाडी कवी म्हणून ओळखला जाणारा आणि गेल्या चाळीस वर्ष महाराष्ट्राला आपल्या वऱ्हाडी कविताने भूल पाडणाऱ्या शंकर बडे विदर्भातील श्रेष्ठ साहित्यिक आहे. ''त्याच्या 'बलिस्टर गुलबा' या एकपात्री प्रयोगाने संपूर्ण महाराष्ट्राला खळखळून हसायला लावले''३

इरवा, सगुन, मुगुट हे खास वऱ्हाडी कवितासंग्रह त्यांचे प्रसिध्द झाले आहे. 'इरवा' च्या तर दोन आवृत्या प्रसिध्द झाला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*मनिषा शालिग्रामजी चरडे, संशोधक,विद्या विकास कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय समुद्रपूर*

**How to cite this article:**
*चरडे, . मनिषा . शालिग्रामजी . (2026). शंकर बडे व्यक्तीमत्व आणि कविता विषेश. Journal of Research & Development, 18(2(A)), 4–9.* https://doi.org/10.5281/zenodo.18923251

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18923251

या कवितासंग्रहातील कविता वेगवेगळया विषयावरील आहे. काही शेतकरी अवस्था प्रगट करते. काही स्त्री—भावना प्रगट करत डोळयात अश्रू आणते तर काही विनोदी कविता खूळखळून हसायला लावते.' धापाधूपी' हा त्यांचा चौथा ललितपर लेखसंग्रह आहे. या पुस्तकामुळे शंकर बडे यांची एक वेगळीच ओळख निर्माण झाली'' ४ हा लेखसंग्रह बडे यांचा चरित्रात्मक लेखसंग्रह आहे. यातून त्यांच्या जीवनातील बऱ्याच प्रसंगाची माहिती मिळते. ''गदय लिखाण केले तरी 'कविता हेच आपले मुळ आहे' असे बडे म्हणतात' १९ 'धापाधूपी' या संग्रहात मानविक बापन्न भागात असे अनेक किस्से आलेले आहेत. हे किस्से सांगतांना ते वाचकांना विश्वासात घेउन त्यांच्याशी संवाद साधतात. निवेदनात त्यांनी अनेक खूब्या वापरल्या, त्यातील एक संवादसाठी ते वाचकासाठी अनेक पात्रे उभी करतात.''६

**लेखनाबद्दल पारदर्शक**

शंकर बडे यांनी आपल्या लेखनाबद्दल खूप पारदर्शकीता ठेवली आहे. त्यांना भेटलेली त्यांनी अनुभवलेली माणसंच त्यांनी लेखातून मांडली आहे. कुटूंबाबद्दल आणि स्वत:बदल सुध्दा ते लिहून मोकळे होतात. 'मिश्किलपणा' हा बडयांचा आनखी एक विशेष होय.

केवळ कवितावर जगण्याचा निर्णय घेणे सोपे नव्हते, पण ते त्यांनी घेतला आणि खरा करुन दाखविला. ते त्यांच्या पत्नीबद्दलही मोकळेपणाने भाष्य करतात. ''जिले मी समजलो आनं समजून घेऊन ते माहा संसार चालवते तिले नाई समजली एकडाव कविता तरी चालते'' असे बडे म्हणतात.'' ७

**निवेदन शैली**

''शंकर बडे यांची निवेदन शैली ही एकवचनी, प्रथम पुरुषी, संवादपर अशी आहे.'' ८ कविता सादर करताना लेखक कवी जसे निवेदन करतात तसे ते करतात. वाचक हा आपल्या समोर श्रोताप्रमाणे बसला आहे. त्याला प्रश्न करून ते वाचकांनाही श्रोत्याप्रमाणे बोलतं करतात. 'मिश्किलपणा' हा जरी त्यांचा स्वभाव असेल तरी चिंतन गर्भताही त्यांनी सोडली नाही त्या चिंतनातून ते वाचकांसमोर जागोजागी वैचारिक गुंता निर्माण करतात.

**वऱ्हाडी भाषा**

''असे म्हणतात की दर बारा कोसावर बोली बदलते, ते खरे आहे संपूर्ण वऱ्हाडात बोलली जाणारी एकच वऱ्हाडी असेल तरी तिचे हेल, तिच्यातील शब्द, त्यांचे उच्चार हे सर्वत्र सारखेच असतील असे नाही मात्र' वऱ्हाडी बोली बडयांनी आपल्या निवदेनासाठी वापरली आहे''. ९

वऱ्हाडी म्हटंल की शब्दाची रुपे बदलतात काही क्रियापद रुपे बदलतात. इतर भाषिक शब्द येतात. नव्या शब्दाची निमिर्ती देखील होताना दिसते.

लेखकाचे कसलेपण त्यांच्या लिखाणातील किरकोळ दोषपायी उणे पडतांना जाणवते तसे किरकोळ दोष प्रत्येकच कवीच्या कवितेत, लेखात असतांना दिसते.

''जिभेचा सगळा जीव बोलीत असतो, बोलीतला जिव्हाळा जिभेवरच्या जगाने जपला आहे. जिभेवरचे जग काळजाच्या कलान कालजान बोलीच बिऱ्हाड होउन जात बोली हाच भाषेचा जलाशय व बलाशय असते. देशभरच्या बोलीतील जे बादशहा आहे त्याच्यातला शंकर बडे हा बलाढच बादशहा आहे बोली इतकाच बुलंद''

असे फ.मु.शिंदे म्हणतात व त्याची पावती देतात.

**ग्रामदर्शन**

शंकर बडे हे ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांची नाळ ग्रामीण भागाशी जुळली आहे. त्यांचा जन्मच बोरी अरबया गावातील असल्याने ग्रामीणांशी त्यांचे सख्य होते. मग साहित्यातही त्यांच्या ग्रामदर्शन घडतांना दिसते. त्याच्या कविता ग्रामीण वाटल्याशिवाय राहत नाही कवितामधून ग्रामदैवत डोकावते गावाचे वर्णन तेथील लोकांचे स्वभाव त्यांचे वर्तन, त्यांची वागण्याची पध्दती जेव्हा कवितेतून डोकावते तेव्हा मात्र वेगळीच गंमत वाटते.

गावाचे स्वरुपच निराळे जे केवळ गावातील व्यक्ती समजून घेऊ शकते. शंकर बडे 'झाडाखाली डोस्की' नावाच्या कवितेते म्हणतात, शहरात खूर्चीवर हजामत होते. पण गावामध्ये झाडाखालची हजामतीची मजा बघीतली नसेल.

''एक फाटक पोत आन
एक वाकडी धोपटी
वस्तऱ्याची धार राहयते
नुसतीच चोपडी.''
इरवा पृ.क्र.१७

काहीही व्यवस्था नसतांनाही कशा पध्दतीने कटींग केली जाते, दाठी केली जाते ही गंमत मात्र शहरच्या व्यक्तींना अनुभवायला मिळत नाही.

''आजचे ग्रामीण साहित्य वास्तव कलाल जाणीवांचा ज्वलंत व प्रभावी अविष्कार करणारे आहे. हे साहित्य दिवसेंदिवस समृध्द करणारे समर्थ परिणाम कारक, गुणात्मक, अव्वल दर्जाचे होणार आहे. हेच खरे मध्यवर्ती मराठी साहित्याचा प्रवाह गतीमान करणारें आहे. मराठी साहित्यात जे एकलेपण निर्माण झाले आहे. ते ग्रामीण साहित्यामुळेच कमी होणार आहे'' १०

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

" ग्रामीण माणसांची सुख दुख, त्यांची स्वपने आशा आकांक्षा, श्रम जय – पराजय यांचे प्रभावी चित्रण त्यांच्या विविध साहित्यातून आलेले दिसून येते" ११.

**शेतकरी आवस्था**

विदर्भात शेतकरी हा आत्महत्या करतो कारण त्याला शेतीत पिकत नाही. पिक पेरले की पाउस येत नाही. पावसाच्या कमतरतेमूळे महागाचे बि बियाने धूळीला मिळतात. दोबार पेरणी उसणे आणुन करतात. पण दुसरी पेरणी सुध्दा वाया जाते. हे एक शेतकरी व्यक्तिला फरवत राहते. पिक हाती येता येता कधी भेटत नाही. इकडून तिकडून शेतात पिके उभी झाली त्याला मशागत करण्यासाठी खत देण्यासाठी शेतकऱ्या जवळ पुरेसा पैसा नसतो, तेव्हा सावकारांचे कर्ज होते पण शेतकरी काय करणार शेतासाठी हवे तेवढे पैसे त्याच्याकडे नसते. शेवटी कापसाचे पिक घरी येते पण येतायेता एवढी कर्ज असतात कर्ज फेडण्यासाठी कापूस पुरत नाही त्यात चांगल्या कापसाला सरकार भाव देत नाही. म्हणून देखील आता कापूस पेरणीकडे शेतकरी दुर्लक्ष्य करु लागले आहे. सगळया कल्लामध्ये शेतकरी फार हवालदिल होतो. मग आत्महत्ये शिवाय त्याचाकडे पर्यायच उरत नाही' अशी शेतकरी अवस्था शंकर बडे च्या 'मुगूट' या कविता संग्रहाचा कवितेत दिसून येते.

'कोप कोप' नावाची कविता 'सगुन' कवितासंग्रहास आहे त्यामध्ये पावसाविना धरतीची अवस्था बडेंनी वर्णन केली आहे.

आता धरतरी दिसे
कसी सांज व सकाळ
जसं इधवा बाईच
वाटे पांढर कपाय।

कवीनी धरतीला विधवा बाईची उपमा देतांना म्हटले आहे –

यंदा निर्सगाच्या सरी
कशा आल्याच नाईना
वांझ बाईच्या कुसीचा
जसा हलेना पायना

कविनी धरतीला वांझ स्त्रीची उपमा दिली व तिचे दुख कवितेत व्यक्त केले आहे.

गेला दुख ही निघुन
नाई पावसाचा थेंब
एका एका थेंबासाठी
कसी उडे बोंबाबोंब
सगुण पृ.क्र. ४८

पावसाशिवाय धरतीमध्ये बी रुजत नाही तेव्हा धरतीची अवस्था खूप वाईट झाली त्यामुळे शेतकरी मात्र आभाळाकडे बघता बघता दुखी व कष्टी होतो.

"खेडयातील मानुस हा शेती फुलवण्यासाठी कठोर कष्ट करत असतो आपली जमिन हिरवी करण्यासाठी तो आपल्या शरीराची कधीही पर्वा करीत नाही. कृषीजीवन अतिशय कष्टाचे अवर्षण आणि पावसाने होरपून जाणारे त्यातून उध्वस्त होणारे एकुणच आयुष्याचे फाटलेपणा हे कृषीजीवनाचे तपशीलवार चित्रण जेव्हा अनुभवाचा विषय बनून अपरिहार्यपणे अविष्कार रुप धारण करते तेव्हाच अस्सल ग्रामीण कविता जन्माला येत असते" १२

" शेतकरी हा जीवनमुल्याचा भोक्ता असतो, जीवनमुल्यावर शेतकऱ्यांची निळा असते म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहे. त्यांच्या मनोरुग्णअवस्थेतून करीत आहे असे म्हटले जाते पण ते खरे नाही मग या आत्महत्तेचे कारण सामाजिक संदर्भात सापडते ज्या परिस्थितीत माणसाची किंवा समुहाची मानहानी होते अथवा कमीपणा येत असतो तेव्हा त्या परिस्थितीत मानुस आत्महत्या करीत असतो" १३.

**निसर्ग वर्णन**

शंकर बडे यांच्या कवितासंग्रहात निसर्गाचेही वर्णन आले. 'पटलं ते रेटल' तशास कोणी खेटल तरीही ' झोल खाची नाही' हा स्वभाव असल्यानी अनुभवाच्या भट्टीतून तापवलेल्या व्यक्तीची चकाकी मात्र त्यांच्या कार्यक्रमात यायची.

काही निसर्गाचे वर्णन त्यांच्या कवितेतून आलेले आहे त्यांची लेखन शैली वऱ्हाड़ी त्या वऱ्हाडी बोलीतून निसर्गाचे वर्णन काही औरच वाटते.

'अभायाच्या रंगाले, या कवितेत कवी अशाच पावसाच्या सरीचे वर्णन करत आहे.

आला भरीवर वारा इजायीचा जोरन्यारा
ढगायीच्या चकाकी पाणी आने तरानरा.
न्हात्याधूत्या पोरीवानी दिसे अभाळाची यन
तिच्या सुवासानं आता झाल अभायाचं पानी.
सगुन पृ.क्र. २६

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

पावसाच्या पाण्याचे जमिनीच्या पडणाऱ्या पाण्याने कसा निसर्ग बदलुनच टाकला अभाळात कसा काळ रंग आला आणि समोरची सारी हकीगत बर्डे यांना कवितेतून व्यक्त केली आहे.

**स्त्री भावना दर्शन**

शंकर बडे यांच्या कविता संग्रहातील बऱ्याच कविता ह्या स्त्री—भावना व्यक्त करणाऱ्या आहे. भावनांची तरलता त्यांच्या कवितेतून डोकावते. कविता वाचतांना त्यातील भाव हा कारुण्यडोहात बुडवून टाकणारा आहे.

'अकात' ही कविता आईच्या सगून प्रेमाची पावती आहे. जसे पक्षी पिलांना चारा भरवून मोठ करते. पण पंख येताच पिल्लू मात्र घरटे सोडून उडून जाते तेव्हा त्यांच्या मायच्या काळजाची अवस्था खूप दयनिय असते त्याचे वर्णन करतांना कवी म्हणतो. . .

पोटाच्या भूकीने चोचीतली चारा
जोराने झोका दे जंगलातला वारा
पंख येता पिल्लू खोयाले सोडते
अकात मायचा कायीज फोडते.
सगून पु.क्र.१

'सगुन' कविता संग्रहातील 'भूल', 'सल' 'तगमग' 'आधार' 'घालमेल' 'मन', 'मनातील गोठ', 'मन नाई ना लागत' निरुप, 'सगुन' ह्या कविता मधून कवीने स्त्रीचे भावनादर्शन घडवीले आहे.

कवीने आपल्या अनेक कविता मधून वेगवगेळया स्त्रीचे भावना दर्शन घडवेले आहे. त्यांच्या कवितेतील स्त्री ही कधी अल्लड मुलगी राहते, कधी सासरी जाणारी मुलगी, कधी सासरी जाऊन भरतारासोबत संसार करणारी स्त्री, तर कधी शेतात कामकरणारी स्त्री राहते कधी छोटया पिल्याची माय. या सर्व अवस्थेत तिच्या मनाची जी घालमेल आहे कवीनी बरोबर टिपली आहे.

'अधार' ही कविता अशा मुलीची आहे जी नुकतीच सासरी गेली व माहेरी पाहुणपणासाठी आली. सासर व माहेर दोंघांच्या मध्ये मात्र नदी आहे. परत जातांना तिचे बेलगाडी नदीच्या पुरामुळे अडकले पण तिला त्याचे दुख नाही.

खचल्या चाकाने
अधार कोनाचा
टयला दिस हा
सासरी जाण्याचा
डोयात खुसीचा
फुलोरा फुलला
माहेरी पाहयता
जीव हा झुलला

नखा नवघ्या मुलीला सासरी जावून आल्यावर माहेरची ओढ जास्तच असते. पुन्हा एकदा लहान होऊन आईवडीलाच्या छायेत बागडावे असे तिला मनोमतनी वाटत असते. म्हणून ही भावना कवितात व्यक्त झाली आहे. पण एकदा सासरी गेली ती मुलगी माहेरची राहत नाही. काही करुन तिला जावेच लागते हे सांगतांना

पुराच्या पान्याला
करीन नवस
उतरु नकोरे
चाळीस दिवस
अशा नवस करुन पुर्ण होणे शक्य नाही
काहीही झाल त
जन का चुकन?
सासरी नांदाच
कस हे हुकन.
सगुन पु.क्र.४२

स्त्रीच्या जीवाले माहेर किती सुखावा देते ह्याचेचे वर्णन कवितेत कवी करतात. याच अर्थाची मन ही कवीता सासरी नांदत असतांना तिला माहेरच्या लोकांची काळजी वाटते. पण तेव्हा निरोपाचे काही साधन नव्हते आता सारखे मोबाईल नव्हते जे एका क्षणात हालचाल विचारता येइल. तेव्हा स्त्री ही येणाऱ्या वाऱ्यालाच आपल्या माहेरच्या लोकांची खुशहाली विचारते.

तिच मन इथ काया
सुदा असो भाऊराया
नाई आला मले व्याया
माय झुरत असनं
तिले चइन नसनं
चाले आसवं पुसनं

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

सगुन पु.क्र.५०

तिचे मन स्वत:लाच विचारते माझा भाउजया ठिक असेल का नाही. तो मला का न्यायला आला नाही आई सुध्दा आपली वाट बघत डोळयातील अश्रू पुसत असेल. अशा अर्थाचे त्यांच्याही जीवाची तगमग रेखाटली आहे. मनातली गोष्ट मात्र पतीला सांगीन तेव्हाच तो माहेरच्या लोकांची भेट घडवून देइल.

'निरुप' या कवितेत तर स्त्री चा भावजयीच्या म्हणजे भावाच्या बायकोच्या आपल्या नंदेविषयी भावना व्यक्त झाल्या आहे. भावजया ही आइच्या जागी असते. भावजयीमुळे बाईचे माहेरपण कधीच संपत नाही. चार दिवस माहेरी गेलेली पोरगी भावजयीसोबत गंमत जंमत करुन माहेरचा सारा आनंद एकवटते. भावजय सुध्दा पाहुनी म्हणून आलेल्या नंदेला पाहुनचार करते.

मी जरी भावजय
मायच्या जागी माना
लेकरु कोनाचयी
मायले फुटे पान्हा
रसाचे आबेगोड
सेंवया टाकू, झिंजू
तावले तुप घरी
कनीक घालु भिजू
अशा पध्दतीचे वर्णन आलेले आहे.
प्र.क.५६

''ग्रामीण स्त्रीचे दुख विविध घटकांनी बांधलेले असते. जसे सण, समारंभ, चालीरीती, रुढी परंपरा, नातेसंबंध, व्यसनाधीनता, श्रद्धा अंधश्रध्दा अशा अनेक घटकातून तिच्या वाटेला दुख येत असले तरी येणारे प्रत्येक दु:ख ती पायाखाली घेत नवा उमेदीने संसाराचा गाडा ओढीत असते. तिच्या श्रमाने शेतीशीवर हिरवे होते. तर तिच्या तळहातात कृषीसंस्कृतीची इमारत उभी आहे. १४

**विनोदात्मक कविता**

शंकर बडे यांचा मिश्किल स्वभाव या स्वभावाचा परिणाम म्हणजे ते बऱ्याच कविता निश्किल पणे लिहीतात त्यामुळे त्यांच्या कवितेत विनोद येतो. विनोद म्हटला की वाचकांचा चेहऱ्यावर हसू उमटला शिवाय राहत नाही.

'इरवा' कविता संग्रह मधील 'इव्हाई' 'हाउसफुल दया' 'पाटलाची पावनी' 'पोरगी पाहाले' 'शहरची पावने' इत्यादी कविता विनोदात्मक आहे ज्या वाचकांना आनंद देउन जातात शिवाय गंमत सांगून जातात.

आला इव्हाई पावना
इन्ह कोनटयात धसे
झाली मनातून खूस
कसी गालातच हसे.
इरवा पृ.क्र. १३

मुला–मुलीचे लग्न झाले की इव्हाई–इन्ह ह्यांचे एक वगेळेच नाते निर्माण होते आजुबाजुचे लोक यांना गंमतीने चिडवतात, लाजून सोडतात. त्याचाच उद्देश घेऊन कवीने त्याची सरभराई कशी विहीन बाई करते ते सांगीतले आहे.

केली पुरनाची पोयी
त्याले तुपाची हो जोडी
झाला इव्हाई भी खुस
आता जुतली हो गाडी।

इव्हाईचा सम्मान म्हणून त्याला पुरणाच्या पोळीचा पाहुणचार करते. त्यावर तुपाचीही धार सोडते. हया सर्व गोष्टीत पाहुण्याचा सन्मानात काही कमतरता राहू नये असेच तिला वाटते त्यासाठी तिची धडपड जाणवते पण लेकीबाईला काही त्रास सासरी होऊ नये हाही एक उद्देश असतो. या सर्व प्रसंगाला गंमतीचे वर्णन कवीने दिले आहे. लेक जायला निघते तेव्हा मायला कशी हुरहुर वाटते. त्याचे वर्णन आलेले आहे.

पोरगी पहाले निघालेल्या नवरदेवा मुलाची गंमत कवीने 'पोरगी पहाले' कवितेत रेखाटली आहे. मुलगी बघीतल्यावर कवी म्हणतो,

पायताच तिले मले आली चक्कर
एका डोयाहून फीरलं होतं वरुदार
सासरा म्हणते कसा पोरगी हाय देखनी
डोयानं थोडीसी पाहवते चेकनी।
इरवा पृ.क्र. ४०

वाचकाला गंमत वाटावी अशी कवीता आहे. विनोदाचा फळस म्हणून पुढे ते म्हणतात

घरात तुमच्या नाही पाहिजे घडी
घोरते अशी जशी आलाराम घड़ी
म्या म्हणलं इचिन भलताच फसलो

चिठ्ठी धाडतो म्हून लवकर उठलो ।

शहरचे पाहुने आले तेव्हा त्यांची कशी फजीती झाली त्याचे वर्णन ‘ शहरचे पावने या कवितेत केलेले आहे.

तो इचारे तिले. . . .
तुम्हाला कटलेट करता येते ?
ते म्हणे हे खटखट कोन करते।
इरवा पृ.क्र.४२

शहराच्या पावल्याचा तोरा पाहुन कवी ही त्यांची जरा फजितीच करतो तो म्हणतो.

काऊन गा कपडे घातले असे
बायकाच्या झांपरचे असते तसे
केसाच जंगल वाढवल तूवा
व्हायच आहे का तुले बुवा।
इरवा पृ.क्र. ४२

असे ऐकून शहराचे पाहुने निघुन जातात. त्याची मिश्कील गंमत कवीने येथे रेखाटली आहे. सगुन कविता संग्रहात देखील अशाच घाटनीची कविता आली आहे.

आमचे दाजी आले पट्याची बनेम घाले
पटयाची बनेम अंगात, मलमलचं कुडत रंगात
त्यातून बनेन दिसे लोक दाजीले हासे
तरी ठुमकत ठुमकत चाले
आमचे दाजी आले.
सगुन पृक्र. ४६

आपली विनोदात्मक शैली प्रस्तूत करतांना शंकर बडे कोणतीही कसर सोडत नाही. ही शैली कविता जुळणी त्यांतून निर्माण झालेली गंमत सारे काही अप्रतिम आहे.

**संदर्भ – टीपा**

1) ना.घ. देशपांडे कवी आणि कविता पदमगंधा प्रकाशन पुणे, पृ.क्र.१४
2) तैत्रव पु.क्र. १७
3) शंकर बडे धापाधूपी सचिन उपाध्याय, विजय प्रकाशन नागपूर पृ.क्र.७
4) तैत्रव पृ.क्र.९
5) तैत्रव पृ.क्र.१०
6) तैत्रव पृ.क्र.६
7) तैत्रव पृ.क्र.९
8) तैत्रव पृ.क्र.९
9) तैत्रव पृ.क्र.९ व १०
10) डॉ. नानासाहेब सूर्यवंशी ग्रामीण साहित्य मुल्य आणि अभिरुची, पदमगंधा प्रकाशन पूणे. पृ.क्र.२९.
11) तैत्रव पृ.क्र.२८
12) तैत्रव पृ.क्र.२०४
13) तैत्रव पृ.क्र.१८९
14) डॉ संतोष चतुर, डॉ गोपाल ढोले, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव पृ.क्र.१२१